पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 19/11/2019 (मंगळवार)
(सकाळ)

---

## सन 2015 पासुन फरार असलेला आरोपी जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

पो. स्टे. खापरखेडा अप. क्र. 239/15 कलम 324,325,504,34 भा.द.वि. मध्ये आरोपी नामे– आकाश हरीश्चंद्र तांडेकर, वय 28 वर्ष, रा. आंबेडकर नगर, वार्ड नं.2, कोराडी, ह.मु. सालई, पारशिवनी हा सन 2015 घटना तारखे पासुन फरार असुन त्याच्या विरुध्द सदर गुन्ह्यात दोषारोप पत्र क्र. 203/15 दि. 28/12/15 अन्वये सी.सी. नं. 08/16 दि. 10/01/16 अन्वये मा. जे.एम.एफ.सी. कोर्ट सावनेर येथे पेश करण्यात आले होते. स्थानीक गुन्हे शाखेचे पथक फरार/पाहीजे आरोपी शोध मोहीम कामी फिरत असता दि. 19/11/2019 रोजी मुखबिर व्दारे बातमी मिळाली की, 04 वर्षापासुन सदर गुन्ह्यात पाहीजे असलेला आरोपी आकाश हरीश्चंद्र तांडेकर, हा प्रकाश नगर कॉलनी, खापरखेडा येथे असल्याची माहीती मिळताच सदर पथकाने वेळ न घालवता प्रकाश नगर कॉलनी, खापरखेडा येथे जावुन आकाश हरीश्चंद्र तांडेकर, वय 28 वर्ष, ह्यास ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही कामी पो. स्टे. खापरखेडा यांचे ताब्यात दिले.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सहा. पोउपनि. लक्ष्मीप्रसाद दुबे, पो. हवा. सुरज परमार, निलेश बर्वे, ना.पो.कॉ. शैलेश यादव, पो.कॉ. प्रणयसिंग बनाफर, विरेंद्र नरड चालक नापोकॉ. अमोल कुथे यांनी केली.



## घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावर मनसर रामटेक येथे दिनांक 17/11/2019 चे 21.00 वा. ते दिनांक 18/11/2019 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संगिता मोहनसिंग पवार, वय 48 वर्ष, रा. मनसर या जनरल स्टोर्सचे दुकान बंद करून घरी गेल्या. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या जनरल स्टोर्सच्या दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानात ठेवलेले आर्टीफिशीयल ज्वैलरी कि. 15,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रावते 9420409454 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावर मौजा ब्राम्हणी शिवार येथे दिनांक 16/11/2019 चे 01.00 वा. ते 03.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गिरीश रविशंकर मडामे, वय 31 वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी, नागपूर हे एम.एस. ई.बी.एल. मध्ये सहायक अभियंता आहेत. तसेच फिर्यादी यांचे उमरेड ग्रामीण मध्ये ब्राम्हणी शिवार हे कार्यक्षेत्र येत असुन त्यांचे सहकारी श्री नस्ताने यांनी फोन करून माहीती दिली की, अज्ञात चोराने 18 विद्युत पोल मधील अंदाजे 4320 मी. लांबीची ॲल्युमिनीयम तार कि. 2,70,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 379 भादंवि. यहकलम 126 भा.वि.का अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रफुल माहुरे 9657865201 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 16 कि.मी अंतरावर मौजा महालगाव शिवार येथे दिनांक 18/11/2019 चे 10.00 वा. ते 10:40 वा. दरम्यान एमएच–36/एल–1376 क्रमांकाचा ट्रॅक्टर व एमएच–36/8492 क्रमांकाचा ट्रॉलीचे चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/– रू. रेती भरून ते वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 5,03,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक फौजदार ठाकुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चाबुकस्वार 9867806415 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर